दि. ~~28~~ 29-02-2020

"e-content and moocs"
या विषयावर workshop घेण्यात आले
प्रमुख:- मार्गदर्शक :- प्रा. डॉ. सचिन कामे
संत जनाबाई महाविद्यालय गंगाखेड
प्रथम कार्यक्रमाचे अध्यक्ष
प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके यांनी ~~मह~~
प्रस्ताविक केले. नॅक ~~मह~~ स्थिती, महाविद्यालया
विषयी माहिती दिली. वर्कशॉपचा फायदा सर्वांनी
घ्यावा. घेतलेली माहिती उपयोगात ~~आण~~ आणली
पाहिजे असे सुचविले.
प्रा कामे सरांनी . e-content विषयी
LCD Projector वर डेमो दाखवून. website.
short video, कसे बनवायचे, moocs विषयी
सखोल माहिती दिली.

दि- 28-02-2020 रोजी
विज्ञान दिन वनस्पतिशास्त्र विभागात साजरा
करण्यात आला।
कार्यक्रमाचे अध्यक्ष : प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके
प्रमुख पाहुणे. प्रा. डॉ. चव्हाण मारुती. प्रा. डॉ. वाकडे
जी. एल, प्रा. ~~विजय~~ देशपांडे संतोष प्रा. विजयमाला धुळे
प्रा. राजेश बिरुणी. प्रा. लक्ष्मी इंदाणी. प्रा. पालवे आर पारस
प्रा. डॉ. नवनाथ शिंदे हे उपस्थित होते तसेच
विज्ञान विभागातील सर्व विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित
होते।

Page No.:
Date:

दि० 07-03-2020

बी.एस.सी तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना
निरोप समारंभ कार्यक्रम.

दि० 07 मार्च 2020 रोजी बी.एस.सी. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके उपस्थित होत्या. प्रमुख उपस्थिती म्हणून प्रा. डॉ. शोभा यशवंते, प्रा. डॉ. ज्योती धर्माधिकारी, प्रा. विठ्ठल गाडेकर प्रा. डॉ. गौतम वाकळे, प्रा. डॉ. सोपान चव्हाण, प्रा. ज्ञानेश्वर नागरे प्रा. विजयमाला घुगे प्रा. लक्ष्मी मॅडम उपस्थित होत्या.

या वेळी बी.एस.सी. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी प्रातिनिधिक स्वरूपामध्ये काही मुलांनी महाविद्यालयात तीन वर्ष शिक्षण घेत असतांना आलेले अनुभव कथन केले. त्यामध्ये कु. सोनाली शिरसाट, कु. पल्लवी काळे, गणेश वरपे, यांनी महाविद्यालयाच्या संदर्भात सांगितले की, महाविद्यालयात शिकतांना शिक्षकांचे मार्गदर्शन नेहमीच चांगले राहिले. आम्हाला आलेल्या अडीअडचणी प्राचार्य मॅडमनी प्राधान्याने सोडविल्या. तसेच महाविद्यालयात होत असलेल्या विविध कार्यक्रमामुळे आम्हाला कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळत गेली. त्याचा फायदा झाला.

अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके मॅडम यांनी सांगितले की, आपल्या मनामध्ये दुसऱ्या विषयी वाईट भावना निर्माण झाली नाही पाहिजे. आपली मैत्री सदैव चांगली ठेवा. मित्रच आपल्याला सुख-दुःखात मदत करीत असतो. इतरांना मदत करीत संस्कार पणे जगण्याचा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विज्ञान विभागाचे प्रा. डॉ. चव्हाण एस.टी. प्रा. डॉ. वाकळे गौतम, प्रा. ज्ञानेश्वर नागरे प्रा. विजयमाला घुगे यांनी परिश्रम घेतले.

Page No.:
Date:

दि 08 मार्च 2020

08 मार्च आंतरराष्ट्रीय महिला दिन
व
'मंथन' भित्तीपत्रकाचे विमोचन

दि. 08 मार्च 2020 रोजी महाविद्यालयातील विशाखा समितीच्या वतीने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमा-च्या अध्यक्षा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके या होत्या तर प्रमुख पाहुण्या सौ. गीता नाकाडे या होत्या. तर प्रमुख उपस्थितीमध्ये प्रा. डॉ. सविता मुंढे उपस्थित होत्या.

प्रथम स्व. इंदिरा गांधी व सावित्री बाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सौ. गीता नाकाडे यांनी सांगितले की स्त्री आता अबला नाही तर ती सक्षम बनली आहे. ती सर्वच क्षेत्रात पुरुषाच्या बरोबरीने काम करीत आहे. तीला संधी देण्याची गरज आहे.

अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके यांनी सांगितले की. स्त्री-पुरुष समाजाचे दोन महत्वाची घटक आहेत. त्यामुळे दोघांचे महत्व समान आहे. आज महिलांवर मोठ्या प्रमाणावर अन्याय अत्याचार होत आहेत. त्यामुळे महिलांनी अन्याय विरोधात लढा उभारण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

या वेळी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'मंथन' या भित्तीपत्रकाचे विमोचन उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. श्रीमती गीता नाकाडे यांनी मंथन भित्तीपत्रकाचे प्रकाशन केले. या प्रसंगी प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके, प्रा. विठ्ठल गाडेकर, प्रा. डॉ. ज्योती धर्माधिकारी, प्रा. डॉ. अलिया कौसर पठाण डॉ. सविता मुंढे, कु. अंजली पुरी, कु. सुजाता नाईक, देवानंद काकडे, समाधान जाधव, प्रदिप लहाने, कु. निशिगंधा सूर्यनारायण

09-मार्च 2020

बी.ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ.

09 मार्च 2020 रोजी महाविद्यालयामध्ये भूगोल विभागाच्या वतीने बी.ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्या-करीता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके मॅडम उपस्थित होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. पांडुरंग सांगळे (विस्तार अधिकारी एल.आय.सी. ऑफ इंडिया) हे उपस्थित होते.

प्रथम प्रमुख पाहुणे मा.श्री.पांडुरंग सांगळे यांचे शॉल व श्री. पुष्पहार देऊन स्वागत करण्यात आले. लायन्स क्लब जालना यांचे वतीने आयोजित केलेल्या दौड मध्ये मा. पांडुरंग सांगळे यांनी प्रथम क्रमांक मिळविला त्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी बी.ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी आपले अनुभव कथन केले. मनोगत व्यक्त केले. यामध्ये कु.अक्षदा चवंडे, राणोबा वरपे, यांनी सांगितले की महाविद्यालयातून मिळालेले ज्ञान, संस्कार प्रेम, नक्कीच भविष्यात उपयोगी पडतील.

या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना श्री. पांडुरंग सांगळे म्हणाले की, वेळ हा आपल्या जिवनामध्ये अत्यंत महत्वाचा आहे. आणि तो कोणत्या कामासाठी खर्च करता त्यावर आपले भविष्य अवलंबून आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपला अधिकाधिक वेळ, अभ्यासासाठी व स्वत: ला सिद्ध करण्यासाठी खर्च करावा. सकारात्मक वृत्ती ठेवून नवीन काही तरी वेगळं करा.

अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके मॅडम यांनी सांगितले की, महाविद्यालयीन शिक्षण घेतांना मिळालेली ज्ञानाची शिदोरी विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविण्यासाठी उपयोगी पडणार आहे. त्यांना जो विषय आवडतो त्या विषयात विद्यार्थ्यांनी पुढे करिअर करावे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भूगोल विभागाचे विभाग प्रमुख प्रा.डॉ. विजय

दि. 12 मार्च 2020

यशवंतराव चव्हाण जयंती.

दि. 12 मार्च 2020 रोजी महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण यांच्या जयंती निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा शिंदे या होत्या. तर प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. दादासाहेब गिरे हे होते.

प्रमुख पाहुणे प्रा. दादासाहेब गिरे यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की, यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्र राज्याचे शिल्पकार आहेत. महाराष्ट्र राज्य निर्मितीमध्ये त्यांचे मोलाचे योगदान आहे. यशवंतराव चव्हाण हे सामान्यांचे नेते होते, ते साहित्यिक होते. कला, साहित्य, उद्योग महाराष्ट्राला दिशा देण्याचे काम त्यांनी केले.

अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ. सुनंदा शिंदे मॅडम यांनी सांगितले की, यशवंतराव चव्हाण यांनी समाजाला नवीन दिशा देण्याचे काम केले. ते राजकारण, समाजकारण करणाऱ्यांसाठी आदर्श आहेत. त्यांचा आदर्श घेऊन समाजात काम करणे महत्वाचे आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. भाऊराव देरगुडे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. ज्योती धर्माधिकारी यांनी मानले. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

दि० 13 मार्च 2020

"कोरोना विषाणू संसर्ग टाळण्यासाठी घ्यावयाची खबरदारी बॅनरचे प्रकाशन / विमोचन"

कोरोना-19 या विषाणूच्या संसर्ग टाळण्यासाठी काय करावे. काय करू नये. याची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी यासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने बॅनर तयार करण्यात आले. हे बॅनर महाविद्यालयात दर्शनि भागामध्ये लावण्यात आले. व त्याचे प्रकाशन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा शिंदे मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी उपस्थितांनी स्वच्छ राहण्याची व कोरोना संसर्ग टाळण्याची शपथ घेतली. या वेळी उपस्थित महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा शिंदे, कार्यक्रम अधिकारी श्री बी.के शिंदे सर प्रा. डॉ. सोमनाथ खाडे, प्रा. विठ्ठल गाडेकर, प्रा. शिवाजी वाघ, प्रा. डॉ. रामपुरे पी.जी. शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'कोरोना' कोवीड-19 च्या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठा अंतर्गत होणाऱ्या पदवी परीक्षा मार्च / एप्रिल 2020 रद्द करण्यात आल्या. सदरील परीक्षा दि. 17 मार्च 2020 पासून होणार होत्या. पुढे विद्यापीठ व महाराष्ट्र शासनाच्या सूचनेनुसार Work from Home दि. 31 मार्च 2020 पर्यंत लागू करण्यात आले. पुढे त्यानंतर 30 एप्रिल पर्यंत वाढ करण्यात आली. त्यामुळे महाविद्यालयात प्रत्यक्ष कोणतेही सांस्कृतिक कार्यक्रम झाले नाहीत.

एप्रिल २०२० मध्ये कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर संपूर्ण महाराष्ट्र व देशभरात लॉकडाउन असल्यामुळे महाविद्यालयात प्रत्यक्षपणे कोणत्याही प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम झाले नाहीत. परंतु खालील महापुरुषांच्या जयंती व स्मृती दिना निमित्त ऑनलाईन अभिवादन करून सर्वांना शुभेच्छा देण्यात आल्या.

06 एप्रिल 2020 - महावीर जयंती.
11 एप्रिल 2020 - महात्मा ज्योतिबा फुले जयंती.
14 एप्रिल 2020 - डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती.
18 एप्रिल 2020 - महात्मा बसवेश्वर जयंती.
30 एप्रिल 2020 संत तुकडोजी महाराज जयंती.

दि. एप्रिल 2020 रोजी. प्रा. विठ्ठल गाडेकर यांनी औरंगाबाद येथे रक्तदान केले.

मे 2020 मध्ये ही लॉकडाउन असल्यामुळे महाविद्यालयात प्रत्यक्ष कोणतेही सांस्कृतीक कार्यक्रम झाले नाहीत. परंतू ऑनलाईन पद्धतीने महापुरुषांना अभिवादन करण्यात आले.

01 मे20-महाराष्ट्र दिन, कामगार दिन.
06 मे20 - राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती दिन.
09 मे 20 - कर्मवीर भाऊराव पाटील स्मृती दिन व महाराणा प्रताप जयंती.
14 मे.20 - धर्मवीर छत्रपती संभाजीराजे जयंती.
21 मे.20 - राजीव गांधी स्मृती दिन
27 मे 20 - रमाई आंबेडकर स्मृती दिन.
28 मे 20 - स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती.

दि 27-05-2020 रोजी zoom ॲप द्वारे महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा शिरके यांनी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची बैठक घेतली. वेळ-12-15 वा. सदर बैठकीमध्ये प्राचार्यांनी सर्वांना कोरोना संसर्ग होऊ नये म्हणून घ्यावयाची काळजी संदर्भात सूचना केल्या. तसेच Work form Home आणि E-content तयार करण्याच्या सूचना केल्या. PPT व्हिडीओ तयार करण्याच्या सूचना केल्या.

दि. 29.08.2020

प्रति,

मा.संपादक साहेब,

दैनिक ________________

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

## राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा

दि. 5 सप्टेंबर 2020 रोजी राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिन शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके या होत्या तर प्रमूख पाहुणे म्हणून प्रा.डॉ.संतोष देशपांडे हे होते.

प्रथमत: डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. नविन पीढी घडवण्यामध्ये शिक्षकांचा फार मोठा हातभार असतो. देशाच्या उज्वल भविष्यासाठी उच्च शिक्षणावर खर्च करणे आवश्यक आहे व समाजाला दिशा देण्याचे काम योग्य प्रकारे पार पाडण्यासाठी शिक्षक अहोरात्र मेहनत घेत असतात असे प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके मॅडम यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रा.डॉ.संतोष देशपांडे यांनी डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. श्रीमती शिलाताई खेडकर याही प्रमूख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. या प्रसंगी सूत्रसंचलन डॉ.ज्योती धर्माधिकारी यांनी केले तर आभार डॉ.सविता मुंढे यांनी मानले. यावेळी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर बंधू भगीनींचे स्वागत करण्यात आले. या प्रसंगी डॉ.आलिया कौसर,डॉ.नवनाथ शिंदे,प्रा.विजयमाला घुगे,प्रा.डॉ.केंदळे, प्रा.नागरे डी.टी.,डॉ.उमेश मुंढे,प्रा.षाजी सहदेवन,प्रा.डॉ.वाकळे,प्रा.डॉ.रामपूरे,श्री.घुले इत्यादी उपस्थित होते.

कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने व शासकीय नियम पाळून संपन्न झाला.


प्राचार्या

PRINCIPAL

Rashtramata Indira Gandhi Arts Science & Commerce College, Jalna

21-06-2020

आंतरराष्ट्रीय योग दिन



26-06-2020

राजर्षी शाहु महाराज जयंती व
दानकुवर कॉलेजच्या प्रा. डॉ. नाथ्रीकर
सेवानिवृत्ती बद्दल सत्कार



03-July-20

महाविद्यालयात हँन्ड सॅनिटायझर मशिनचे उद्घाटन करताना कर्मचारी वर्ग.



२० Aug-२०

भारतरत्न राजीव गांधी जयंती सद्भावना दिवस साजरा महाविद्यालयात करताना।



23-Aug-20

राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय=वर्धापन
दिन झेंडावंदन करताना महाविद्यालयाच्या
प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके
वर्धापन - डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ औरंगाबाद



27 Aug-20

राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय वर्धापन दिनानिमित्त सर्व विभागप्रमुखांची बैठकीस संबोधीत करताना संस्थेचे सचिव प्रा. डॉ. सत्संग मुंढे सर



29-Aug-2020



जून 2020 मध्ये कोवीड-19 च्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊन असल्यामुळे महाविद्यालयामध्ये प्रत्यक्ष सांस्कृतिक कार्यक्रम होऊ शकले नाहीत. मात्र युवकांना ऑनलाईन आविष्कार करण्यात आले. तर वेगवेगळ्या विषयावर ऑनलाईन वेबीनारचे आयोजन करण्यात आले.

03 जून 20 - लोकनेते गोपीनाथ मुंडे स्मृती दिन.

04 जून 2020 रोजी प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके यांनी zoom App द्वारे प्राध्यापक व कर्मचारी यांची बैठक दु. 12.15 वाजता घेण्यात आली. सदरील बैठकीमध्ये प्राध्यापकांना ऑनलाईन वेबीनार, चर्चासत्रे, परिषदा घेण्याच्या सूचना केल्या. मोठ्या संख्येने प्राध्यापक व कर्मचारी बैठकीला उपस्थित होते.

दि. 07 जून 2020 रोजी भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने व IQAC च्या वतीने एकदिवसीय आंतरराष्ट्रीय वेबीनारचे आयोजन करण्यात आले होते. "Role of science and Higher Eucation in pandemic" हा होता. तर Resourse person म्हणून - Mr. Shrikant Khake, postdoctoral Researcher, Osaka University Osaka, Japan हे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके या होत्या. वेबीनार यशस्वी करण्यासाठी प्रा. डॉ. संतोष देशपांडे, प्रा. डॉ. गौतम वाकडे, प्रा. डॉ. ज्ञानेश्वर नागरे, डॉ. सोपान चव्हाण, प्रा. विजय मुंडे, प्रा. विजयमाला घुगे, प्रा. राजेश्री शिंगाने, प्रा. ईशानी मोरे इत्यादींनी प्रयत्न केले.

दि. 11 जून 2020 महाविद्यालयाच्या सर्व भाषा विभागां वतीने एक दिवसीय बहुभाषिय राष्ट्रीय वेबीनारचे आयोजन करण्यात आले होते.
विषय - "Teaching of Languagesin post covid scenario" हा होता.
या वेबीनार साठी प्रमुख उद्घाटक म्हणून प्रो. डॉ. उत्तम अंभोरे विभागप्रमुख इंग्रजी विभाग, डॉ. बा. आ. म. वि. औरंगाबाद हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून ① डॉ. एजी खान, Former Director, BCUD, Dr. B.A.M.U Aurangabad. होते
② डॉ. मनोहर जाधव, मराठी, विभाग प्रमुख, सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे.
③ डॉ. अलका नारायण गडकरी, विभाग प्रमुख हिंदी, शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ~~कन्नड~~ कन्नड.
④ प्रो. डॉ. नितीन जारवडे, विभाग प्रमुख, संगणक व इंजिनिअरिंग हिरकणी कॉलेज, जबलपूर हे होते.
कार्यक्रमाच्या अध्यक्षा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके या होत्या.
कार्यक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. ज्योती धर्माधिकारी, प्रा. डॉ. अभिमन्यु बिक्कड, प्रा. डॉ. उमेश मुंडे प्रा. डॉ. आलिया कौसर पठाण, प्रा. डॉ. शोभा यशवंते, डॉ. दादा साहेब गिन्हे, प्रा. विठ्ठलगावकर प्रा. अब्दुल वहाब शेख. यांनी केले व कार्यक्रम यशस्वी केला.
विविध महाविद्यालयातील एकूण 800 प्राध्यापकांनी सहभाग घेतला.

दि. 12 जून 2020 रोजी महाविद्यालयातील सर्व सामाजिक शास्त्रे विभागाच्या वतीने एक दिवसीय राष्ट्रीय वेबीनारचे आयोजन करण्यात आले होते. सदरील वेबीनारचा विषय - "कोविड नंतरची आव्हाने आणि उपाय" असा होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्था महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके या होत्या. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून

(1) प्रो. डॉ. स्मिता अवचार, सिनेटसदस्य, समाजशास्त्र विभाग, डॉ. बा. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद.

(2) प्रो. डॉ. दादासाहेब गजहंस, विभाग प्रमुख, भूगोल विभाग अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना.

(3) प्रो. डॉ. आर. जी. रसाळ अर्थशास्त्र विभाग, पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय प्रवरानगर हे होते.

कोविड-19 नंतरची भारतीय समाजा समोरील आव्हाने आणि उपाय योजना या विषयावर मान्यवरांचे मार्गदर्शन झाले. व अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके यांनी केला.

सदरील वेबीनारचे आयोजन व नियोजन हे प्रा. डॉ. शिंदे एन एस, प्रा. डॉ. म्हस्के बी. एल, प्रा. डॉ. प्रमोद चव्हाण प्रा. डॉ. सविता मुंढे, प्रा. पाळवे आर. एस, प्रा. भारती अर्दवन, प्रा. डॉ. गोवर्धन खंडेकर प्रा. डॉ. विजय केंद्रके, प्रा. डॉ. प्रमोद टोकणे, प्रा. वाघ बी. डी. प्रा. डॉ. सोमिनाथ खाडे. प्रा. सचिन जयस्वाल यांनी केले.

वेबीनारचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. शिंदे एन. एस, व प्रा. डॉ. सोमिनाथ खाडे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. प्रमोद चव्हाण यांनी मानले. टेक्निकल सहकार्य प्रा. कुंडाळे यांनी केले.

दि. 13-जून 2020 रोजी "Intellectual Property Right (IPR) and patent filling" या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय वेबीनारचे आयोजन करण्यात आले होते. या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी Resource person म्हणून Dr. BeTkar m.m. principal, shri Kumarswami Mahavidyalaya, Ausa, हे होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा शिंदे या होत्या. या वेळी प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य डॉ. बेटकर सर यांनी Intellectual property Right म्हणजे काय, त्यांचे प्रकार इत्यादींची सविस्तर माहिती दिली.

सदरील वेबीनारचे आयोजन व नियोजन विभागप्रमुख, गणित विभाग, प्रा. विजयमाला धुळे व रसायनशास्त्र प्रा. नागरे डी. टी. यांनी केले. या वेबीनारचे सूत्रसंचालन प्रा. धुळे व्ही. डी यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. डी. टी. नागरे यांनी केले.

मोठ्या संख्येने प्राध्यापकांनी वेबीनारमध्ये सहभाग नोंदवला.

दि. 21-06-2020 रोजी महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी मनोज सदाशिव कोल्हे याची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या जुलै-2019 च्या परीक्षेमधून उपशिक्षणाधिकारी पदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

यावेळी त्यांचे वडील मा. श्री. सदाशिव कोल्हे. आई मिराबाई कोल्हे यांचा ही यावेळी सत्कार करण्यात आला. हा सत्कार समारंभ प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके यांच्या हस्ते पार पडला. या वेळी. कार्यक्रमास अधिक्षक श्री. बी.के. शिंदे, प्रा. डॉ. सोमिनाथ रसाळे, प्रा. लहुराव दरगुडे, प्रा. विजय तिडके, प्रा. डॉ. संतोष देशपांडे उपस्थित होते. तसेच श्री. सुरेश धुळे उपस्थित होते.

दि. 26-06-2020 रोजी महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज जयंती चा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके या होत्या. तर प्रमुख पाहुण्या म्हणून प्रा. डॉ. अलका नाग्रेकर या होत्या. या वेळी डॉ. नाग्रेकर मॅडम यांच्या सेवानिवृत्ती निमित्त त्यांचा प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा. सचिन जोस्वाल यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या बद्दलचे विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे आयोजन इंग्रजी विभागाच्या वतीने करण्यात आले होते. विभागाच्या वतीने ही मॅडमचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन प्रा. डॉ. ज्योती धर्माधिकारी यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. विठ्ठल गाडेकर यांनी केले.

दि. 03-जुलै 2020 रोजी महाविद्यालयात हँण्ड सॅनिटायझर मशिनचे उद्घाटन करण्यात आले

(दि. 03-07-2020 पासुन कोरोना-19 चा प्रादुर्भाव रोखण्या करिता आणि विद्यार्थी व कर्मचारी यांचे आरोग्याची काळजी करिता महाविद्यालयात हँण्ड सॅनिटायझर मशिन बसविण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके कार्यालयीन अधीक्षक श्री. शिंदे बी. बी. प्रा. विठ्ठल गाडेकर, प्रा. डॉ. आलिमा कौसर, प्रा. डॉ. देशपांडे संतोष व इतर कर्मचारी उपस्थित होते.

Page No.:
Date:

सद्‌भावना दिन.

दि:

२० ऑगस्ट २०२० रोजी भारतरत्न राजिव गांधी यांची जयंती "सद्‌भावना दिन" म्हणुन साजरी करण्यात आली

कार्यक्रमाचे अध्यक्ष: प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके

प्रमुख पाहुणे प्रा. पाळवे सर सुत्रसंचलन प्रा. डॉ. चव्हाण एस. टी. व व उपस्थित महाविद्यालय शिक्षक कर्मचारी

आभार. प्रा. शेख वाहेद

दि - 23 ऑगस्ट 2020

" महाविद्यालय वर्धापन दिन"

दरवर्षी महाविद्यालयात 23 - ऑगस्ट रोजी महाविद्यालय वर्धापन दिन साजरा करण्यात येतो सावर्षी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

संचलन. प्रा. डॉ. रामपुरे पी. जी. आणि कार्यक्रमास उपस्थित कर्मचारी.

ध्वजारोहणाच्या नंतर सर्व विषयाचे विभाग प्रमुखाची बैठक आयोजित करण्यात आली या प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रा. सत्संग मुंडे सर (संस्था सचिव).

दि. 29 - ऑगस्ट 2020 रोजी महाविद्यालयात "राष्ट्रीय खेळ दिन" साजरा करण्यात आले

ध्यानचंद हॉकीचे जादुगार यांची जयंती "राष्ट्रीय खेळ दिन म्हणुन साजरी करण्यात आली. प्र. कार्यक्रमाचे अध्यक्ष

दि. 15.09.2020

प्रति,

मा.संपादक साहेब,

दैनिक ________________

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

# सांस्कृतिक विरासत की भाषा-हिंदी

**- प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके**

राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालया मध्ये हिंदी दिवस हा राष्ट्रीय कार्यक्रम शासनाने पूर्ण नियम व अटी लक्षात घेऊंन, सोशल डिस्टींगंशन ठेवून आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके या होत्या. आपल्या भाषणात त्यांनी हिंदी भाषेत मानवी मूल्य जपल्या जाते व भावना व्यक्त केल्या जातात असे सांगितले तसेच कोविड-19 या कारोना काळात मानवी संवाद हा महत्वाचा झाला आहे. व माणासाने माणसाला दिलासा हा भाषेच्या माध्यमातूनच दिला पाहीजे ही आज काळाची गरज आहे असेही त्या म्हणाल्या.

प्रमूख पाहुणे प्रा.डॉ.शोभा यशवंते यांनी हिंदी भाषेचे महत्व सांगून विविध उदाहरणे देऊन मानवीय संवेदना जपण्याचे उत्कृष्ठ माध्यम म्हणजे हिंदी भाषा आहे असे सांगितले. प्रा.सचिन जयस्वाल यांनी सूत्रसंचलन व प्रास्ताविक केले तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ.ज्योती धर्माधिकारी यांनी मानले.

याप्रसंगी प्रा.नागरे डी.टी., प्रा.डॉ.खेडकर जी.आर., प्रा.डॉ.सविता मुंढे, श्रीमती शिलाताई खेडकर, श्री.घुले व इतर प्राध्यापक, विदयार्थी तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी सोशल डिसटींगसींग ठेवून उपस्थित होते.

प्राचार्या / PRINCIPAL
Rashtramata Indira Gandhi Arts
Science & Commerce College, Jalna

दि. 17.09.2020

प्रति,

मा.संपादक साहेब,

दैनिक ________________

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

## श्रीमती शुभदा मुंढे यांच्या हस्ते
## राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात ध्वजारोहन संपन्न

दि.17 सप्टेंबर 2020 रोजी राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त श्रीमती शुभदा सत्संग मुंढे यांच्या हस्ते ध्वजारोहन झाले. मा.सौ. शुभदा मुंढे हया जालना शहरामध्ये एक नामांकित महिलांमध्ये एक आहेत.त्यांनी आश्लेषा किडस इंग्लीश स्कूल ची स्थापना केली [illegible] शिक्षणासाठी प्रेरणा मिळावी यासाठी शाळेत विनामुल्य प्रवेश सुरु केला. यासाठी त्यांना सन 2015 चा महाराष्ट्र Womans power अॅवार्ड मिळाला आहे.

याप्रसंगी महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके, श्री.भास्क्र शिंदे, प्रा.डॉ.रामपूरे, प्रा.डॉ.शोभा यशवंते, प्रा.डॉ.ज्योती धर्माधिकारी, प्रा.डॉ.विक्रम दहिफळे, प्रा.रामनाथ पालवे, प्रा.दरगुडे,श्रीमती शिलाताई खेडकर, श्री.घुले एस.बी. व इतर कर्मचारी उपस्थित होते.

कोविड-19 कोरोना काळात शासनाचे पूर्ण नियम पाळून व विशिष्ट अंतर सांभाळून ध्वजारोहन करण्यात आले.

प्राचार्या
PRINCIPAL
डॉ. सुनंदा तिडके
Rashtramata Indira Gandhi Arts
Science & Commerce College, Jalna

दि. 23.09.2020

प्रति,
मा.संपादक साहेब,
दैनिक ____________
जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

# राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात कर्मवीर भाऊराव पाटील जयंती उत्साहात साजरी

दि.22 सप्टेंबर 2020 रोजी राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती संपन्न झाली. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. या कार्यक्रमास महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके हया अध्यक्ष म्हणून लाभल्या त्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्वातंत्र्योत्त्र व स्वातंत्र्या पूर्वी ही शैक्षणिक व सामाजिक कार्याला गति देण्याचे कार्य केले. महापुरुषांनी जे कार्य केले ते स्मरणात ठेवून समाजाची वाटचाल केली पाहीजे असे डॉ.तिडके म्हणाल्या.

प्रमूख पाहुणे म्हणून प्रा.डॉ.शिंदे एन.एस. यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या वैचारीक प्रभावामूळे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. सद्य परिस्थितीत 5 लाखाहून अधिक विदयार्थी आज शिक्षण घेत आहेत. असे सांगितले. श्री.बी.के. शिंदे यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंती निमित्त हार्दिक शुभेच्छा दिल्या.

हा कार्यक्रम सोशल डिस्टींगसिंग ठेवून व शासनाचे नियम पाळून करण्यात आला. महाविदयालयातील सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.डॉ.ज्योती धर्माधिकारी यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.सचिन जयस्वाल यांनी केले.

प्राचार्या
डॉ.सुनंदा तिडके

PRINCIPAL
Rashtramata Indira Gandhi Arts
Science & Commerce College, Jalna

दै. पुण्यनगरी दि. २९ नोव्हेंबर २०२०

# राष्ट्रमाता महाविद्यालयात संविधान फलकाचे अनावरण

**जालना/प्रतिनिधी**

राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात संविधान उद्देशिका फलकाचे अनावरण व संविधान पूजन प्रा. सत्संग मुंढे यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके होत्या. प्रा. सत्संग मुंढे म्हणाले, आपले भारतीय संविधान जगातील सर्वोत्तम संविधान असून सर्व मानवाला समानतेने न्याय देणारे आहे. अशा संविधानाचे पालन करणे आपल्या सर्वांचे आद्य कर्तव्य आहे. प्राचार्या सुनंदा तिडके म्हणाल्या, संविधानाने स्त्रियांना मोठ्या प्रमाणात अधिकार दिले आहेत. त्या अधिकाराचे जागरण होणे आवश्यक आहे. प्रास्ताविक डॉ. प्रमोद चव्हाण यांनी केले. सूत्रसंचलन प्रा. सचिन जयस्वाल यांनी केले. उद्देशिका सामूहिक वाचन प्रा. डॉ. सोमीनाथ खाडे यांनी केले. कार्यक्रमास भास्कर शिंदे, प्रा. भीमराव वाघ, डॉ. दादासाहेब गिऱ्हे यांच्यासह प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

5 Sep-2020

महाविद्यालयात शिक्षक दिन डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जयंती साजरी करताना।



14-sep-2020

14 सितंबर 2020 राष्ट्रीय हिंदी दिवस समारोह मनाते हुए प्रधानाचार्य डॉ. सुनंदा तिडके डॉ. यशवंते एवं प्रा. सचिन जायस्वाल



17 Sep-2020

मराठवाडा मुक्तीदिन कार्यक्रम झेंडावंदन



31-oct-2020

राष्ट्रमाता इंदिरा गांधी पुण्यतिथी
व
सरदार वल्लभभाई पेटल जयंती.






11 NOV-2020

मौलाना आझाद जयंती

# جالنہ کے اندرا گاندھی کالج میں یوم تعلیم



جالنہ: 12 رنومبر (بذریعہ لیاقت علی خان) مولانا ابوالکلام آزاد کی یوم پیدائش کے موقع پر راشٹر ماتا اندرا گاندھی کالج جالنہ میں یوم تعلیم کا انعقاد کیا گیا۔اس تقریب کی صدارت پرنسپل ڈاکٹر ستنداتر کے نے کی۔مہمانان خصوصی کی حیثیت سے صدر شعبہ اردو راشٹر ماتا اندرا گاندھی کالج جالنہ ڈاکٹر عالیہ کوثر، ڈاکٹر یشونتے، ڈاکٹر منڈے، پروفیسر چن جیسوال بھابڑ اور دیگر اساتذہ کرام اور غیر تدریسی عملہ موجود تھا۔اس موقع پر صدر شعبہ اردو ڈاکٹر عالیہ کوثر نے ملک کے پہلے وزیر تعلیم مولانا ابوالکلام آزاد کی حیات خدمات اور شخصیت پر اظہار خیال کرتے ہوئے مولانا کی علمی اور قلمی کاوشوں کی تفصیلات پیش کیں اور کہا کہ مولانا آزاد نے اپنے قلم کے ذریعہ ایک انقلاب برپا کیا اور تحریک آزادی میں روح پھونکنے کا کام کیا۔ مولانا کی نگارشات آج بھی ہمارے لیے بالخصوص ہمارے طلبہ وطالبات کے لئے ایک نمونہ ہے۔اس موقع پر پرنسپل ڈاکٹر ستنداتر کے نے صدارتی خطاب کیا۔

14 NOV-2020

पंडित जवाहरलाल नेहरू जयंती (बालदिन)



19-NOV-2020

राष्ट्रमाता इंदिरा गांधी जयंती



25-NOV-2020

महाराष्ट्राचे प्रथम मुख्यमंत्री कै.यशवंतराव चव्हाण
स्मृती समारोह



भारतीय संविधान दिन

26-NOV-2020

4




प्रस्तावनेचे सामुहिक वाचन



Page No.:
Date:

05 सप्टेंबर 2020 रोजी महाविद्यालयात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जयंती "शिक्षक दिन" म्हणुन साजरी करण्यात आली. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष: प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके
प्रमुख पाहुणे. प्रा. डॉ. देशपांडे संतोष.
सुत्रसंचालन प्रा. डॉ. सविता देशपांडे यांनी केले
आभार - प्रा. डॉ. ज्योती धर्माधिकारी

दि. 14 सप्टेंबर 2020 रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय हिंदी दिवस साजरा करण्यात आले यावेळी मार्ग प्रा. डॉ. शोभा यशवंते यांनी हिंदी भाषा विषयी कसी ओवर आहे हे पटवुन दिले कार्यक्रमाचे समारोप प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके यांनी अध्यक्षीय समारोप केला. सुत्रसंचालन व आभार प्रा. सचिन जायसवाल यांनी केले.

दि. 17 सप्टेंबर 2020 रोजी महाविद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन ध्वजारोहण करुन साजरा करण्यात आला. ध्वजारोहण प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित महाविद्यालयीन कर्मचारी

दि. 31 ऑक्टोबर 2020 रोजी "राष्ट्रमाता इंदिरा गांधी पुण्यतिथी व सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती महाविद्यालयात साजरी करण्यात आली.
कार्यक्रमाचे अध्यक्ष - प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके
प्रमुख मार्गदर्शक. प्रा. सत्संग मुंढे सरांनी इंदिरा गांधी व वल्लभ भाई पटेल यांच्या कार्या विषयी मार्गदर्शन केले प्रमुख उपस्थिती विजय कामठे यांनीही मार्गदर्शन केले.

Page No.:
Date:

11 नोव्हेंबर 2020 रोजी महाविद्यालयात "मौलाना आझाद" यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य तिडके ~~हे~~ होते. यांनी अध्यक्षीय समारोपात मौलाना ~~आझा~~ आझाद यांच्या कार्या विषयी मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. आलिया कौसर व महाविद्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

दि. 14 नोव्हेंबर 2020 रोजी 'पंडीत जवाहरलाल नेहरू यांची जयंती "बालदिन" म्हणुन साजरी करण्यात आली.
पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करताना प्रा. जयस्वाल व विद्यार्थी.

दि. 19 नोव्हेंबर 2020 "राष्ट्रमाता इंदिरा गांधी जयंती"

इंदिरा गांधी यांची जयंती पुष्पहार अर्पण करून साजरी करण्यात आले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके, प्रा. गाडेकर. प्रा. जयस्वाल

दि. 25 नोव्हेंबर 2020 महाविद्यालयात महाराष्ट्राचे प्रथम मुख्यमंत्री कै. यशवंतराव च्व्हाण स्मृती समारोह कार्यक्रम घेण्यात आले.
कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके.
प्रमुख उपस्थिती प्रा. पाटवे, प्रा. डॉ. शोभा यशवंते.
व ~~इतर~~ महाविद्यालयीन प्राध्यापक उपस्थित.

26 नोव्हेंबर "भारतीय संविधान दिन"

महाविद्यालयात उद्देशिका प्रस्तावनेचे सामुहिक वाचन घेण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रा. सत्संग मुंढे सरांच्या हस्ते करण्यात आले.
कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके.
सुत्रसंचलन - प्रा. डॉ. सोमिनाथ खाडे यांनी केले.
उपस्थितांचे आभार प्रा. जयस्वाल सरांनी केले.
या कार्यक्रमाला महाविद्यालयीन प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते
प्रा. सत्संग मुंढे सरांच्या हस्ते उद्देशिका फलकाचे अनावरण करण्यात आले

दि. 28 नोव्हेंबर 2020 रोजी महाविद्यालयात महाविद्यालयाच्या प्रांगणात महात्मा जोतिबा फुले यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम घेण्यात आले.
कार्यक्रमाचे अध्यक्ष - प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके
प्रमुख मार्गदर्शक - प्रा. रामनाथ पालवे.
सुत्रसंचलन प्रा. डॉ. महस्के की [illegible] व उपस्थित कर्मचारी

दि. 06 - डिसेंबर 2020 रोजी महाविद्यालयात भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनाचा कार्यक्रम घेण्यात आले.
कार्यक्रमाचे - अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके. प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. सरावते, श्री. बी. के. शिंदे सर. संचलन प्रा. डॉ. खाडे सर
कार्यक्रमाला प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते

दि. 12 - डिसेंबर 2020 रोजी लोकनेते स्व गोपिनाथराव मुंडे साहेब यांच्या जयंतीचा कार्यक्रम महाविद्यालयात घेण्यात आले.
कार्यक्रमाचे अध्यक्ष - प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके. मार्गदर्शक प्रा. डॉ.

॥ [illegible]
यांची जयंती साजरी ॥

जालना येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय, जालना येथे दि. १२।१२।२०२० रोजी स्व. लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांची जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी प्रारंभी स्व. गोपीनाथरावजी मुंडे यांच्या प्रतिमेस कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके, प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. सोमिनाथ खाडे यांनी पुष्पहार अर्पण केला.

यावेळी प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. सोमिनाथ खाडे हे म्हणाले की स्व. लोकनेते गोपीनाथराव मुंडे हे जनसामान्यांचे नेते होते तसेच सर्व समाजातील व तळागाळातील लोकांसाठी सतत कार्य करीत राहणे हा त्यांचा स्वभाव होता म्हणून आजही त्यांनी केलेल्या कामाची आठवण येत राहते असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके यांनी म्हटले की स्व. गोपीनाथरावजी मुंडे यांनी सर्व जाती धर्मातील लोकांसाठी कार्य केले आहे. याचबरोबर समाजात वावरत असताना कोणत्याही व्यक्तीने साधा फोन जरी केला तर त्यांचे व्यवस्थित काम करणे हे आपले कर्तव्य आहे असे समजून ते काम करीत असे त्यामुळे त्यांच्या केलेल्या कामाची पावती म्हणून सर्व जनता त्यांना स्मरणात ठेवत आहे. असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. डॉ. सोमिनाथ खाडे यांनी केले तर आभार प्रा. रामनाथ पालवे यांनी मानले. या कार्यक्रमास प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

प्राचार्य
PRINCIPAL
Rashtramata Indira Gandhi Arts
Science & Commerce College, Jalna

दै. लोकमत
दि. 29/12/2020

# युवा संसद वक्तृत्व स्पर्धेत शिवानी सिरसाट, हर्षल व्यवहारे गुणानुक्रमे ठरले अव्वल

लोकमत न्यूज नेटवर्क

**जालना :** नेहरू युवा केंद्र आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित युवा संसद वक्तृत्व स्पर्धेत शिवानी सिरसाट व हर्षल व्यवहारे यांनी बाजी मारली आहे, तर संदीप जरक यांनी तृतीय क्रमांक मिळविला आहे.

नेहरू युवा केंद्र जालना व राष्ट्रीय सेवा योजनांतर्गत जिल्हास्तरीय युवा संसद वक्तृत्व स्पर्धा मंगळवारी राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात पार पडली. या स्पर्धेत शिवानी सिरसाट प्रथम, तर हर्षल व्यवहारे द्वितीय आला आहे, तर संदीप जरक याने तृतीय क्रमांक पटकावला आहे. पहिल्या दोन विजेत्यांना आता राज्यस्तरीय स्पर्धेत प्रवेश मिळाला आहे.



गुणानुक्रमे आलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. सुनंदा तिडके, राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक डॉ. प्रा. सोमीनाथ खाडे, प्रा. डॉ. भीमराव वाघ, प्रा. डॉ. दादासाहेब गिऱ्हे, मिलिंद सावंत, बाळासाहेब देशमुख, जयपाल राठोड, रघुवीर गुढे, गणेश वर्पे आदींची उपस्थिती होती.

स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. भीमराव वाघ व प्रा. दादासाहेब गिऱ्हे यांनी कामकाज पाहिले.

दि. 4.01.2021

प्रति,

मा.संपादक साहेब,

दैनिक ________________

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

# राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी

जालना येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालय, जालना येथें दि. 03/01/2021 रोजी सांस्कृतिक विभागाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके,प्रमुख पाहुणे प्रा.रामनाथ पालवे,प्रा.विठठल गाडेकर यांनी प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला.

यावेळी प्रमुख पाहुणे प्रा.रामनाथ पालवे यांनी आपले विचार व्यक्त करतांना म्हटले की, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी शिक्षण क्षेत्रात काम करुन सामाजिक क्रांती घडवली आहे. याच बरोबर सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणासाठी कार्य केल्यामुळे सर्व समाजात सामाजिक जागृती होत आहे.असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके यांनी म्हटले की, स्त्रीयांना शिक्षण मिळावे म्हणून समाजात झगडणा-या प्रणेत्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले होत्या. तसेच महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी सती च्या प्रथेला व रुढी परंपरेला विरोध करण्याचे काम केले आहे. विशेषत: सामाजिक व्यवस्था व कुटुंब व्यवस्था चांगली चालविण्यासाठी स्त्री-पुरुषाची समानतेची गरज आहे. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी रुढी परंपरा अंधश्रध्दा व अनिष्ट प्रथा नष्ट करण्याचे मोठे कार्य केले आहे. असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.सचिन जयस्वाल यांनी केले तर आभार प्रा.विठठल गाडेकर यांनी मानले. या कार्यक्रमास प्राध्यापक वृंद,शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

करिता प्राचार्या
Rashtramata Indira Gandhi Arts
Science & Commerce College, Jalna

o/c

दि. 12.01.2021

प्रति,

मा.संपादक साहेब,

दैनिक ________________

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

## राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी

जालना येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात आज दि. 12/01/2021 रोजी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके या उपस्थीत होत्या तर प्रमूख पाहुणे म्हणून प्रा.डॉ.गोवर्धन खेडकर व प्रा.डॉ.संतोष देशपांडे हे लाभले होते. सर्वप्रथम राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रमूख पाहुणे प्रा.डॉ.गोवर्धन खेडकर बोलतांना म्हणाले की, राजमाता जिजाऊंनी शिवबाला घडवले आणि महाराष्ट्रामध्ये ख-या अर्थाने लोकशाहीचे दर्शन घडले. उदारमतवादी राजा घडवण्याचे अतिशय कठीण काम राजमाता जिजाऊंनी केले आहे.त्याच बरोबर स्वामी विवेकानंदांच्या बालपणापासून चा इतिहास त्यांनी उलगडून दाखवला. आजच्या तरुण पिढींनी स्वामी विवेकांनदांचा आदर्श आपल्या डोळयासमोर ठेवून त्यांच्या पावलावर पाऊल टाकून आपल्या जीवनाचे मार्गक्रमण केले पाहिजे.कार्यक्रमाचे दुसरे पाहुणे प्रा.डॉ.संतोष देशपांडे यांनी असे प्रतिपादन केले की, अतिशय प्रतिकूल परिस्थीतीमध्ये स्वामी विवेकानंदांचा जन्म झाला. लहानपणापासूनच त्यांची तलख बुध्दीमत्ता व नवनवीन गोष्टीविषयीची जिज्ञासा अशा प्रकारची जिदद त्यांच्यात होती. देव कुठे भेटेल अशा प्रकारचे प्रश्न ते विचारायचे. शिकागो धर्म परिषदेमध्ये भारताचे प्रतिनीधीत्व करुन त्यांनी जगाला जिंकले.

अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके म्हणाल्या की, बदलत्या समाज रचनेत व समाज व्यवस्थेत राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या विचारांची गरज आहे.आजही समाजव्यवस्थेत स्त्रीयांवर अन्याय,अत्याचार मोठया प्रमाणात होत आहेत. त्यासाठी जिजाऊ व विवेकानंद यांच्या विचारांची गरज आहे. राजमाता जिजाऊ यांनी जसे शिवरायांची जडणघडण केली तसे आपल्या मुलां-मुलींवर संस्कार होणे गरजेचे आहे. विदयार्थ्यांनी त्यांचा आदर्श आपल्या डोळयासमोर ठेवून जीवनाची जडणघडण केली पाहीजे.

या कार्यक्रमासाठी महाविदयालयातील विदयार्थी, विदयार्थीनी प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थीत होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.सचिन जयस्वाल यांनी केले तर आभार प्रा.डॉ.सोमीनाथ खाडे यांनी मानले.

मा. संपादक साहेब
दै.

॥ राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिन साजरा ॥ दि. १४/०१/२०२

जालना येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय, जालना येथे दि. १४ जानेवारी २०२१ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिन साजरा करण्यात आला. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके, प्रमुख पाहुणे मा. सुरेश डावखरे (सेवानिवृत्त पोलिस अधिकारी) प्रमुख उपस्थिती मा. डॉ. जी. एस. मानकरी, श्री अक्कर शिंदे (कार्यालय अधीक्षक) यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुणे मा. सुरेश डावखरे यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले की, भारतीय संविधानाने आपल्या सर्वांना जगण्याचे बळ दिले आहे. तसेच नामांतर लढा उभारण्याचे काम आम्ही सर्वांना संघटीत होऊन केले. यांचबरोबर लोकशाही समाजव्यवस्था ही नेमून दिलेल्या कायद्यानुसार चालवली पाहिजे असे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थिती असलेले मा. डॉ. एस. जी. मानकरी यांनी म्हटले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व समाजाला अधिकार दिले आहेत. व समाज एकत्र ठेऊन या देशात कार्य केले. नामविस्तार दिनाचे महत्त्व वाढविण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा प्रसार होण्यासाठी सर्वांनी कार्य करणे गरजेचे आहे. या विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यासाठी खूप संघर्ष करावा लागला आहे. त्यामुळे यापुढेही सर्वांनी एकत्र येऊन विद्यापीठासाठी महत्त्वाचे कार्य करावे. असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके यांनी आपले विचार व्यक्त करताना म्हटले की महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सर्व महामानवांच्या कार्यामुळे आपल्या सर्वांना सगळं काही मिळाले आहे हा विचार मनात ठेवून विद्यार्थ्यांसाठी खूप काम केले पाहिजे. तसेच सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया ही पुढे आणखी जास्त गतीमान केली पाहिजे. असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. लहुराव दराडे यांनी केले तर आभार प्रा. रामनाथ पालवे यांनी मानले या कार्यक्रमास प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

प्राचार्य

06. डिसें. 2020


भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर
महापरिनिर्वाण दिन



राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात विश्वरत्न डॉ. बाबासाहेबांना विनम्र अभिवादन करतांना प्राचार्या सुनंदा तिड़के, डॉ. सोमीनाथ खाडे, भास्कर शिंदे आणि महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी वर्ग आदी.

19-Dec-2020

महाविद्यालयात रक्तदान शिबिरात सहभागी स्वयंसेवक.





28-Dec-2020

विश्वविक्रमवीर गजानन मिसाळ
(बुलेटवर मागे बसुन हात न लावता
200 km. गाडी चालवल्याबद्दल गिनीज
बुक ऑफ वर्ल्ड मध्ये नोंद केल्याबद्दल
सत्कार.





03 - Jan - 2021
03 - Jan - 2021







क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती

07 Jan-2021

प्रसिद्ध साहित्यीक रेखा गतखणे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन व सत्कार प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके यांच्याहस्ते.



25 - जानेवारी 2021 मराठी भाषा संवर्धन
पंधरवाडा निमित्त व्याख्यान




संत भगवान बाबा पुण्यतिथी
दि - 29 - 01 - 2021



राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती
दि - 30 - 01 - ~~20~~ 2021



दि - 0 ... जयंती

दि-07-02-
2020
... रमाई
जयंती



दि - १५ - ०२ - २०२१ - संत सेवालाल महाराज जयंती।



19-2-2021 छत्रपती शिवाजी महाराज जयंती



27-02-2021 मराठी राजभाषा दिन.



दि-28-02-2021
राष्ट्रीय विज्ञान
दिन.



28-Dec-2020

विश्वविक्रमवीर गजानन मिसाळ (बुलेटवर मागे बसुन हात न लावता 200 km. गाडी चालवल्याबद्दल गिनीज बुक ऑफ वर्ल्ड मध्ये नोंद केल्याबद्दल सत्कार.





03 - Jan - 2021

03 - Jan - 2021







क्रांतीज्योती सावीत्रीबाई फुले जयंती

28-Dec-2020


विश्वविक्रमवीर गजानन मिसाळ (बुलेटवर मागे बसुन हात न लावता 200 km. गाडी चालवल्याबद्दल गिनीज बुक ऑफ वर्ल्ड) मध्ये नोंद केल्याबद्दल सत्कार.



07 Jan-2021

प्रसिध्द साहित्यीक रेखा गतखाने यांच्या पुस्तकांचे प्रकाशन व सत्कार प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके यांच्याहस्ते.






28 फेब्रुवारी 2020 विज्ञान दिवस साजरा करतांना.
प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके, प्रा. डॉ. एस.टी. चव्हाण, प्रा. डॉ. गौतम वाकळे प्रा. डॉ. संतोष देशपांडे प्रा. नागरे जी.टी. प्रा. इंदा

दि. ८/०३/२०२०

08 मार्च आंतरराष्ट्रीय महिला दिन




8 मार्च 2020 महिला दिना निमित्त कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके, प्रमुख पाहुण्या, सौ. गीता नाकाडे, प्रा. डॉ. सविता मुंढे, प्रा. डॉ. आलिया औसर मॅडम व इतर.



भित्तीपत्रक प्रकाशन प्रसंगी प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके,

दि: 12/03/2020




12 मार्च 2020 रोजी यशवंतराव चव्हाण यांच्या जयंती निमित्त मार्गदर्शन करतांना प्राचार्य. डॉ. सुनंदा तिडके प्र. पाहुणे प्रा.डॉ. बाबासाहेब गिन्हे, प्रा. लहुराव दरगुडे व इतर उपस्थित मान्यवर.



दि. 13/03/2020



13 मार्च 2020 कोरोना संसर्ग टाळण्यासाठी घ्यावयाच्या खबरदारी मार्गदर्शन बॅनरचे प्रकाशन / विमोचन प्रसंगी प्राचार्य डॉ. सुनंदा शिंदे, एन.एस.एस. कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक, कर्मचारी व स्वयंसेवक, विद्यार्थी, स्वेच्छेने शामिल होतांना.

दिनांक :- 26/06/2021

प्रति,

मा.संपादक साहेब,

दैनिक ____

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

# राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात राजर्षी शाहू महाराज यांची जयंती साजरी

जालना येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालय,जालना येथे दि.26/06/2021 रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती 'समाजिक न्यायदिन' म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी प्रारंभी राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके, प्रमूख पाहुणे प्रा.डॉ.शोभा यशवंते यांनी अर्पण केला.

यावेळी प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.शोभा यशवंते मॅडम म्हणाल्या की, राजर्षी शाहू महाराज यांची प्रगतशील राजा म्हणून ओळख आहे. राजर्षी शाहू महाराज यांनी सर्वांना प्राथमिक शिक्षण मोफत देण्याचे कार्य केले. तसेच समाजातील जातीभेद नष्ट करण्याचे मोठे काम त्यांनी केले. त्याचबरोबर सर्वसामान्य लोकांच्या मनातील लोककल्याणकारी राजा म्हणून गोरगरीबांसाठी सतत परिश्रम घेत राहिले असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके यांनी म्हटले की, राजर्षी शाहू महाराज यांनी सामाजिक न्याय या दृष्टीकोणातून अतिशय महत्वाचे काम केले. तसेच सर्व जाती धर्मासाठी वेगवेगळी वसतीगृह काढली व त्यांना प्रेरणा देण्याचे कार्य केले. विशेषत: सर्व समाजासाठी आरक्षणाचे काम त्यांनी केले त्यामुळे त्यांना आरक्षणाचे जनक म्हणून ओळखले जाते. समाजामध्ये राजर्षी शाहू महाराज यांनी गोरगरीब दीन दलित व इतर सर्वांसाठी विविध कामे करुन दिशा दाखविण्याचे कार्य मोठे केले आहे. तसेच कोल्हापूर,सोलापूर, सातारा या परिसरामध्ये वसतीगृह, शैक्षणिक कार्य,धरण,बंधारे निर्माण करुन आदर्श उभा केला असे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.सचिन .जयस्वाल यांनी केले तर आभार प्रा.डॉ.प्रमोद चव्हाण यांनी मानले या कार्यक्रमास प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

प्राचार्य
PRINCIPAL
Rashtramata Indira Gandhi Arts
Science & Commerce College, Jalna

दिनांक :- 22/06/2021

प्रति,

मा.संपादक साहेब,

दैनिक ____________

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

## राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात श्री.भास्कर शिंदे (कार्यालयीन अधिक्षक) यांच्या सेवानिवृत्ती निमित्त गौरव सोहळा संपन्न

जालना येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालय,जालना येथे दि.18/06/2021 रोजी श्री.भास्कर शिंदे (कार्यालयीन अधिक्षक) यांच्या सेवानिवृत्ती निमित्त गौरव सोहळा संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके, प्रमूख पाहुणे श्री.अर्जून भाबड, प्रा.डॉ.शोभा यशवंते, प्रा.रामनाथ पालवे यांची उपस्थिती होती.

प्रारंभी राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच सत्कारमूर्ती श्री.भास्कर शिंदे यांचा सपत्नीक शाल-श्रीफळ व पुष्पहार देवून सत्कार करण्यात आला.यावेळी प्रमुख पाहुणे प्रा.रामनाथ पालवे म्हणाले की, माणुस कतृत्वाने मोठा होतो. शिंदे सरांचे कतृत्व मोठे आहे. महाविदयालयामध्ये सरांचा सिंहाचा वाटा आहे. सरांनी विविध प्रकारचे चांगले कार्य केलेले आहे. त्यामुळे त्यांची जालना शहरात चांगल्या प्रकारे ओळख झालेली आहे. तसेच प्रा.डॉ.शोभा यशवंते यांनी श्री.शिंदे सरांबददल विचार व्यक्त करतांना म्हटले की, ज्ञान,बल,फुल या गोष्टीचा अहंकार व्यक्तीला असतो. पण श्री.शिंदे सर यांनी निरपेक्ष पणे काम केलेले आहे. कधीही कामाची कुचराई केलेली नाही. शिंदे सर यांचे महाविदयालयासाठी मोठे योगदान आहे. असे मत व्यक्त केले.

श्री.अर्जुन भाबड सर यांनी सांगितले की, महाविदयालयामध्ये श्री.शिंदे सर यांच्या सोबत आम्ही सुरुवातीपासून प्रशासनातील विविध कामे केली तो अनुभव आमच्यासाठी प्रेरणा देणाराच ठरतो असे मत व्यक्त केले आहे.

यावेळी सत्कारमूर्ती श्री.भास्कर शिंदे सर (कार्यालयीन अधिक्षक) यांनी सत्काराला उत्तर देतांना म्हटले की, माणसाने आरसा होवून जगलं पाहीजे. व्देष भावनेतून केलेले काम कधीही चांगले होवू शकत नाही. तसेच महाविदयालयामधून मी जरी सेवानिवृत्त झालो असलो तरी मला महाविदयालयाची कायम आठवण येत राहणार आहे. मी डबक्या सारखं जीवन कधीच जगणार नाही मी सतत प्रवाही राहणार व आजही मला सेवानिवृत्त झाल्यासारखे वाटत नाही मी सतत याही पुढे माझे कार्य करित राहणार आहे असे मत व्यक्त केले. यावेळी अनेक कर्मचारी यांनी मनोगत व्यक्त केले आहेत.

या कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके यांनी म्हटले की, श्री.भास्कर शिंदे (कार्यालयीन अधिक्षक) यांनी महाविदयालयाच्या सुरुवातीपासून भौतिक सुविधा, महाविदयालयातील प्रशासकीय कामकाज अतिशय काळजीपूर्वक केले. याच बरोबर महाविदयालय स्तरावर कार्य करित असतांना श्री. शिंदे सर यांनी समाजामध्ये सुध्दा चांगल्या प्रकारे कार्य केले आहे. त्यामुळे त्यांची चांगली ओळख निर्माण झाली आहे.

तसेच महाविदयालयातील कुठलीही समस्या योग्य पध्दतीनुसार सोडवूण महाविदयालयाचा विकास करण्याचे काम त्यांनी केलेले आहे. विशेषत: प्राचार्य व अधिक्षक यांच्या संवादामुळे महाविदयालयाला चांगली ओळख निर्माण झाली असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.डॉ.सोमीनाथ खाडे यांनी केले तर आभार प्रा.डॉ.गौतम वाकळे यांनी मानले या कार्यक्रमास प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्त्र कर्मचारी यांची उपस्थिती होती.

प्राचार्य 22-06-2021

PRINCIPAL

डॉ. सुनंदा तिडके

Rashtramata Indira Gandhi Arts

दि. 23.03.2021

प्रति,

मा.संपादक साहेब,

दैनिक ________________

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

## राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात
## हुतात्मा दिन कार्यक्रम साजरा

दि.23 मार्च 2021 रोजी राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात हुतात्मा दिन, शहीद दिनानिमित्ताने स्वातंत्रयवीर भगत सिंग यांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके या होत्या तर प्रमूख पाहुणे प्रा.डॉ.चव्हाण एस.टी. व कदिम जालना पोलीस स्टेशनचे होमगार्ड श्री.कृष्णा तूपे हे होते. आजच्या शहीद दिनाच्या निमित्ताने आपण देशासाठी हुतात्मा झालेल्या प्रत्येक सैनिकाचे स्मरण केले पाहीचे असे प्राचार्य डॉ.तिडके यांनी सांगितले.

याप्रसंगी प्रा.डॉ.सोमीनाथ खाडे, प्रा.डॉ.आलिया कौसर,प्रा.डॉ.शोभा यशवंते, प्रा.विजयमाला घुगे, प्रा.डॉ.ढोकणे,प्रा.डॉ.खेडकर व इतर प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.दरगुडे लहुराव यांनी केले तर आभार प्रा.विठठल गाडेकर यांनी केले. या प्रसंगी शासनाचे पूर्ण नियम पाळून सेल्फ डिस्टींगसिंग पाळल्या गेले.

प्राचार्या

PRINCIPAL

Rashtramata Indira Gandhi Arts
Science & Commerce College, Jalna

दि. 23.03.2021

प्रति,

मा.संपादक साहेब,

दैनिक ______________

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

**स्व.इंदरराव मुंढे तात्या यांना राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयातर्फे भावपुर्ण श्रध्दांजली**

दि.23 मार्च 2021 रोजी स्व.इंदरराव मुंढे यांचा आज पहाटे 4.00 वाजता वृध्दापकाळामूळे निधन झाले आहे. त्यांनी आपल्या संपूर्ण जीवनात सर्वांशी जिव्हाळयाचे संबंध ठेवले होते. इंदरराव मुंढे हे तात्या नावांने सुपरिचित होते. भगवान शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष मा.आमदार डॉ.नारायणराव मुंढे यांचे ते काका असून माजी पंतप्रधान चंद्रशेखर यांचे ते निकटवर्तीय कार्यकंर्ते ही होते. त्यांना जालना मतदार संघातून लोकसभेची उमेदवारी मिळाली होती.

इंदरराव तात्यां यांच्या निधनामुळे सच्चा प्रेमळ व राष्ट्रमाता परिवाराचा हितचिंतक माणूस गमवला आहे असे मत महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके यांनी व्यक्त केले.

तसेच या प्रसंगी सरस्वती भूवन शाळेचे शिक्षक अदवंत सर यांनाही श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी प्रा.डॉ.सोमीनाथ खाडे, प्रा.लहुराव दरगुडे,प्रा.विठठल गाडेकर, प्रा.डॉ.एस.टी.चव्हाण,श्री.कृष्णा तूपे,प्रा.डॉ.शोभा यशवंते,प्रा.डॉ.आलिया कौसर,प्रा.विजयमाला घुगे व इतर प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

शासनाचे नियम पाळून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

प्राचार्या
PRINCIPAL
Rashtramata Indira Gandhi Arts
Science & Commerce College, Jalna

दि. 12.03.2021

प्रति,

मा.संपादक साहेब,

दैनिक ____________________

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

## राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात
## आधुनिक महाराष्ट्राचे जनक यशवंतराव चव्हाण यांची जयंती उत्साहात साजरी

दि.12 मार्च 2021 रोजी राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात आधुनिक महाराष्ट्राचे जनक व कर्तव्यदक्ष भूतपूर्व मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी प्रमूख पाहुणे म्हणून डॉ.उमेश मुंढे हे होते. यशवंतराव चव्हाणांच्या जीवनावर त्यांनी प्रकाश टाकला व त्यांचे जीवन म्हणजे चालता-बोलता एक आदर्श होता हा आदर्श जनतेने घेतला पाहिजे असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.विठठल गाडेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.सचिन जयस्वाल यांनी केले. यावेळी शिक्षकेत्तर कर्मचारी,प्राध्यापक वृंद व विदयार्थी उपस्थित होते.

प्राचार्य
PRINCIPAL
Rashtramata Indira Gandhi Arts
Science & Commerce College, Jalna

दि. 10.03.2021

प्रति,
मा.संपादक साहेब,
दैनिक ____________
जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

## राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात
## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा स्मृतीदिन संपन्न

दि.10 मार्च 2021 रोजी राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात आदयशिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी भगवान शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव व कॉंग्रेस कमिटीचे जिल्हा सरचिटणिस प्रा.सत्संग मुंढे हे उपस्थित होते. सावित्रीबाईचा आदर्श विदयार्थ्यांनी, शिक्षकांनी घ्यावा व शिक्षण क्षेत्रात प्रगती करावी असे त्यांनी सांगितले.

यामसंगी प्रा.डॉ.सोमीनाथ खाडे,सांस्कृतिक विभागाचा कार्यभार सांभाळणारे प्रा.विठठल गाडेकर,प्रा.डॉ.शिंदे एन.एस., प्रा.डॉ.शोभा यशवंते,प्रा.विजयमाला घुगे,प्रा.डॉ.सविता मुंढे, प्रा.शोभा गायकवाड प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विदयार्थी उपस्थित होते.

प्राचार्य / PRINCIPAL
Rashtramata Indira Gandhi Arts
Science & Commerce College, Jalna

दि. 10.03.2021

प्रति,

मा.संपादक साहेब,

दैनिक ________________

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

## राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात
## 8 मार्च जागतिक महिला दिन संपन्न

दि.8 मार्च 2021 रोजी राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी आदय शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

प्रमूख पाहुणे म्हणून मृगनयनी मोहरीर हया होत्या.विदयार्थीनींनी करिअर निवडतांना बिजनेस निवडला. आकाशात उंच भरारी पण घेता आली पाहीजे व घरटयाकडे लक्षही देता आले पाहिजे. आपल्याकडे सुपरवूमेन ची जी कल्पना आहे ती फार जाचक आहे. सर्व स्तरावर महिलांनीच काम केलं पाहिजे असं असायला नको.अस मत व्यक्त केले.

दुस-या प्रमूख पाहुण्या प्रा.विजयमाला घुगे यांनी आपल्याला आनंद मिळेल असे कार्य करावे व आनंद मिळवावा आपली आवड निवड ओळखावी व अंग निवडावे. स्त्री ही जन्मदाती,संस्कृती नाविण्याचा वसा, घराचं घरपण असते. स्वत:च्या करिअरचे उदाहरण देऊन त्यांनी आनंद कसा मिळवता येतो ते सविस्तर पणे सांगितले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ.सविता मुंढे यांनी केले व आभार प्रदर्शन डॉ.आलिया कौसर यांनी मानले. याप्रसंगी प्रा.डॉ.शोभा यशवंते,प्रा.डॉ.ज्योती धर्माधिकारी, प्रा.शोभा गायकवाड, शिलाताई खेडकर, प्रा.डॉ.नवनाथ शिंदे,प्रा.डॉ.प्रताप रामपूरे, प्रा.डॉ.एस.टी.चव्हाण, विदयार्थीनी व कर्मचारी उपस्थित होते.

PRINCIPAL
Rashtramata Indira Gandhi Arts
Science & Commerce College, Jalna

दिनांक :- 26/01/2021

प्रति,

मा.संपादक साहेब,

दैनिक ________________

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

## राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयामध्ये 26 जानेवारी प्रजासत्ताक दिन साजारा

जालना येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालय, जालना येथे दि.26.01.2021 रोजी सकाळी ठीक 7.20 मिनिटाने प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. प्रारंभी डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पुजन करुन प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भारतीय संविधान उददेशिकेला पुष्पहार अर्पण करुन भारतीय संविधाचे सामूहिक वाचन करण्यात आले.

याप्रसंगी महाविदयालयातील विदयार्थी श्री.प्रदीप वाघ यास मतदार जनजागृती अभियान घोषवाक्य या स्पर्धेत प्राप्त झाला याबददल प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला. तसेच माजी विदयार्थीनी प्रा.डॉ.स्नेहल वायकोस हिचा ही सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास श्री.भास्कर शिंदे (का.अधिक्षक), प्रा.भिमराव वाघ,प्रा.डॉ.सोमीनाथ खाडे,प्रा.विठठल गाडेकर प्रा.डॉ.आलिया कौसर मॅडम,श्री.सुरेश घुले यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे ध्वजसंचलन प्रा.डॉ.प्रताप रामपूरे (शारिरीक शिक्षण विभाग) यांनी केले. तसेच या कार्यक्रमास प्राध्यापक वृंद,शिक्षकेत्तर कर्मचारी, विदयार्थी यांची प्रामूख्याने उपस्थिती होती.

प्राचार्या

PRINCIPAL
Rashtramata Indira Gandhi Arts
Science & Commerce College, Jalna

01C

दि. १५/०१/२०२१

दै. बदलता महाराष्ट्र

PAGE NO :
DATE: / /

# राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिन साजरा

जालना (प्रतिनिधी) : जालना येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय, जालना येथे दि. १४ जानेवारी २०२१ रोजी डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस कार्यक्र माचे अध्यक्ष प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके, प्रमुख पाहुणे मा. सुरेश डावखरे ( सेवा निवृत्त पोलिस आधीकरी ) प्रमुख उपस्थिती मा. डॉ. जी. एस. मानकरी,श्री.भास्कर शिंदे (कार्यलयीन अधिक्षक) यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुणे मा. सुरेश डावखरे यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले



की , भारतीय संविधानाने आपल्या सर्वांना जगण्याचे बळ दिले आहे. तसेच नामांतर लढा उभारण्याचे काम आम्ही सर्वांनी संघटीत होऊन केले. याचबरोबर एंकदरित समाजव्यंवस्था ही नेमून दिलेल्या कायद्यानुसार चालवली पहिजे. असे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थितीत असलेले मा. डॉ. एस. जी. मानकरी यांनी म्हटले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व समाजाला आधीकार दिले आहेत. व समान हक्क देवून या देशात कार्य केले . नामविस्तार दिनाचे महत्व वाढवण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा प्रसार होण्यासाठी सर्वांनी कार्य करणे . गरजेचे आहे. . या विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यासाठी खुप संघर्ष करावा लागला आहे. यामुळे या पुढेही सर्वांनी एकत्र येऊन विद्यापीठां साठी महत्वाचे कार्य करावे . असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी (पान २ वर)

## राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालत...

कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके यांनी आपले विचार व्यक्त करताना म्हंटले की, महात्माफुले , राजर्षी शाहू महाराज , डॉ .बाबासाहेब आंबेडकर या सर्व महामानवाच्या कार्यामूळे आपल्याला सर्वांना सगळं काही मिळाले आहे हा विचार मनात ठेवून विधार्थांसाठी खूप मोठे कार्य केले पाहिजे तसेच सामाजिक आभिसरणाची प्रक्रिया ही पुढे जास्तीच जास्त गतिमान केली पाहिजे . असे प्रतीपादन केले .या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. लहुराव दरगुडे यांनी केले. तर आभार प्रा.रामनाथ पालवे यांनी मानले. या कार्यक्रमास प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी विघार्थी यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

दि: 27-02-20

दि. 27-02-2021 रोजी राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय जालना येथे मराठी राजभाषा दिन म्हणून साजरा करण्यात आले. कवि वि. वा. शिरवाडकर यांची जयंती व तसेच संतश्रेष्ठ रविदास महाराज जयंती चे कार्यक्रम घेण्यात आले.
कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके यांनी अध्यक्षीय भाषणात शिरवाडकर आणि रविदास महाराज यांच्या कार्या विषयी मार्गदर्शन केले.
कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून प्रा. डॉ. उमेश मुंडे हे होते. सुत्र संचलन व आभार प्रा. डॉ. दादासाहेब शिंदे यांनी व्यक्त केले.

दि. 28-02-2021 रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आले. थोर शास्त्रज्ञ सी. व्हि. रामण यांची जयंती दिन हा राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरी करण्यात येते.
सी. व्हि. रामन यांच्या कार्या विषयी चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाला उपस्थित प्रा. डॉ. सोपान चव्हाण, प्रा. डॉ. डी. एल. वाकळे, प्रा. विजय मुंडे, प्रा. ज्ञानेश्वर नागरे आणि प्रा. रामनाथ पालवे हे होते.

दि. 08.03.2021 रोजी महाविद्यालयात विशाखा समीती च्या वतीने "आंतरराष्ट्रीय महिला दिवस" साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून सौ. मृगनयनी मोहरील व प्रा. विमलमाला धुगे या होत्या. या वेळी सौ. मृगनयनी मोहरील यांनी मार्गदर्शन करतांना विद्यार्थिनींना सांगितले की, व्यवसाय व नोकरीच्या संधी हया आपल्या आवडीच्या क्षेत्रातीलच शोधाव्यात, निवडाव्यात त्यातुन आपल्याला कामाचा आनंद मिळतो. त्या स्वतः करीत असलेल्या

या वेळी दुसऱ्या प्रमुख पाहुण्या प्रा. विजयमाला धुगे यांनी मार्गदर्शन करताना सांगीतले की, प्रत्येकाने आपल्यामधील कौशल्य, गुण ओळखूनच संधी शोधल्या पाहीजेत. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. डॉ. सविता मुंढे यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. अनिसा कौसर पठाण यांनी मानले. या कार्यक्रमास मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

दि. 10 मार्च 2021 रोजी महाविद्यालयात 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथी' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके या होत्या. तर प्रमुख पाहुणे प्रा. सत्संग मुंढे सचिव, म.शि.मं. गेवराई हे होते. या वेळी प्रा. सत्संग मुंढे यांनी सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करून उपस्थितांना मार्गदर्शन केले. फुले पति-पत्नी यांनी प्रस्थापित समाजव्यवस्थेला केवळ विरोध केला नाही तर समाजात सामाजिक परिवर्तन घडवून आणले. विशेष स्त्रियांच्या शिक्षणासाठी, शाळा सुरु केल्या. स्त्रियांना आत्मसन्मान निर्माण करून देण्याचा प्रयत्न केला. या वेळी अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके मॅडम यांनी सावित्रीबाई फुले जिवन संघर्षाचा प्रवास व कार्य यांची माहीती दिली. या वेळी प्राध्यापक, विद्यार्थी, कर्मचारी उपस्थित होते.

दि. 11-04-2021 रोजी महाविद्यालयात "महात्मा फुले जयंती" कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा शिंडके या होत्या. तर प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. पठाण आलिया कौसर या होत्या. यावेळी कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या प्रा. डॉ. पठाण आलिया कौसर यांनी महात्मा फुले यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. तर अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्या डॉ. सुनंदा शिंडके यांनी महात्माफुले यांच्या विचारांची सद्यस्थितीमधील प्रासंगिकता स्पष्ट केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सचिन जयस्वाल यांनी केले. तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. सोपान चव्हाण यांनी मानले. या प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

दि. 14-04-2021 रोजी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा शिंडके या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून कार्यालयीन अधीक्षक श्री. भास्कर शिंदे हे होते. यावेळी, श्री. भास्कर शिंदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन व कार्य या विषयावर मार्गदर्शन केले. तर अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्या डॉ. सुनंदा शिंडके यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वेगवेगळ्या कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. ज्योती धर्माधिकारी यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. सोमीनाथ खाडे यांनी मानले. यावेळी मोठ्या प्रमाणावर प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.

- दि. 01 मे 2021 "महाराष्ट्र दिन" औचित्य साधून प्राचार्या डॉ. सुनंदा शिंडके यांनी 'झूम' च्या माध्यमातून ऑनलाईन बैठकीचे आयोजन दि. 12.00वा. केले. या बैठकीत महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या तसेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीत बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांना अभिवादन केले. या बैठकीत विद्यार्थ्यांना ऑनलाईन परीक्षेच्या संदर्भात मार्गदर्शन करण्याचे आवाहन प्राध्यापकांना केले.

Page No.:
Date:

दि० 06-05-2021 रोजी महाविद्यालयात राजर्षी शाहूमहाराज पुण्यतिथी निमित्ताने त्यांना अभिवादन करण्यात आले. या अभिवादन कार्यक्रमाच्या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा शिंदे, श्री० भगवान भिंगारे, श्री. संजय मुंढे, श्रीमती शिवकांत खडकर उपस्थित होत्या. या वेळी प्राचार्या डॉ. सुनंदा शिंदे यांनी शाहूमहाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थितांना शाहू महाराजांनी केलेल्या कार्याविषयी मार्गदर्शन केले०

दि० 16-05-2021 रोजी खासदार राजीव सातव यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या श्रद्धांजली कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा शिंदे, प्रा. डॉ. सोमीनाथ खाडे, श्री. धनंजय वाघ, श्री. पद्माकर मोराळ, श्री. सुरेश धुळे, व इतर उपस्थित होते. या वेळी प्राचार्या डॉ. सुनंदा शिंदे व प्रा. डॉ. सोमीनाथ खाडे यांनी राजीवजी सातव यांनी केलेले कार्य व त्यांच्या आठवणी सांगितल्या. व राजीवसातव यांच्या आत्म्यास शांती मिळावी यासाठी प्रार्थना केली०

दि० 19 मे 2021 रोजी "झूम ॲप" वर प्रा. डॉ. संतोष देशपांडे यांनी ऑनलाईन बैठक घेऊन सर्वांना नॅकच्या तयारी संदर्भात मार्गदर्शन केले. नॅक करण्यासाठी आवश्यक असणारी तयारी करण्याचे आवाहन त्यांनी सर्वांना केले. या बैठकीस महाविद्यालयाच्या प्राचार्या अध्यक्षस्थानी उपस्थित होत्या. प्राचार्यांनी सर्वांना नॅक संदर्भात तयारी करण्यासंदर्भात सूचना केल्या. व कोरोनाचे नियम पाळून आरोग्याची काळजी घेण्याचे सांगितले. व सर्वांना मानसिक धीर दिला.

दि. 21-05-2021 रोजी महाविद्यालयात स्व. राजीव गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्ताने स्व. राजीव गांधी यांना अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके, प्रा. विजय तिडके श्री. भगवान भिंगारे, श्री. सुरेश धुले उपस्थित होते. यावेळी प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके यांनी स्व. राजीव गांधी यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. व उपस्थितांना मार्गदर्शन केले.

दि. 25-05-2021 रोजी महाविद्यालयातील सेवानिवृत्त कर्मचारी श्री. बापूसाहेब आंधळे यांचे दुःखद निधन झाल्यामुळे त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके, प्रा. डॉ. संतोष देशपांडे, श्री. संतोष साबळे सौ. उज्वला संतोष साबळे, श्रीमती शिलाबाई खेडकर, रघुवीर मुंडे व इतर उपस्थित होते.

यावेळी प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके यांच्यासह उपस्थित सर्वांनी दुःख व्यक्त केले. व कै. बापूसाहेब आंधळे यांच्या आत्म्यास शांती लाभावी यासाठी प्रार्थना केली.

दि. 27-05-2021 रोजी महाविद्यालयात पंडित जवाहरलाल नेहरू यांची पुण्यतिथी व माता रमाई आंबेडकर यांच्या स्मृतीदिना निमित्ताने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके, प्रा. डॉ. दादासाहेब गिन्हे, प्रा. डॉ. शेख वहाब, प्रा. सचिन जयस्वाल, श्री. भगवान भिंगारे श्री. संजय मुंडे उपस्थित होते.

यावेळी प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. सूत्र संचालन प्रा. सचिन जयस्वाल केले तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. दादासाहेब गिन्हे यांनी मानले.

दि. ३१ मे २०२१ रोजी महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंती निमित्ताने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांना अभिवादन करण्यात आले. या वेळी उपस्थित महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके, प्रा. डॉ. संतोष देशपांडे श्री. अर्जुन भावके उपस्थित होते. यावेळी प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके यांनी अहिल्याबाई होळकर यांच्या शौर्याची व कार्याची माहिती उपस्थितांना दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. संतोष देशपांडे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार श्री. संतोष साबळे यांनी मानले.

8 मार्च 2021 आंतरराष्ट्रीय महिला दिन



मार्गदर्शन करतांना प्रमुख पाहुण्या सौ. मृगनयनी मोहरील, उपस्थित प्रा. डॉ. सविता मुंढे, प्रा. विजयमाला घुगे



10 मार्च 2021 क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुण्यतिथी-कार्यक्रम



सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करतांना संस्थेचे सचिव प्रा. सत्संग मुंढे, प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके, प्राध्यापक व कर्मचारी

11 एप्रिल 2021 महात्मा फुले जयंती कार्यक्रम




महात्मा फुले यांना अभिवादन करतांना प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके

दि. 14 एप्रिल 2021 भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती कार्यक्रम.




डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना (प्रतिमेस) पुष्पहार अर्पण करतांना प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके, प्रा. डॉ. ज्योती धर्माधिकारी - श्री. बी. के. शिंदे इत्यादी




उपस्थितांना मार्गदर्शन करतांना प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके,

दि - 06-05-2021 राजर्षी शाहू महाराज पुण्यतिथी कार्यक्रम



राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करतांना प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके, श्री. भगवान भिंगारे.

दि: 16-05-2021 स्व. खासदार राजीव सातव यांना
भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण कार्यक्रम



महाविद्यालयात स्व. खासदार राजीव सातव यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतांना प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके, प्रा. डॉ. सोमीनाथ खाडे व इतर प्राध्यापक व कर्मचारी वृंद

दि: 21-मे-2021 स्व. राजीव गांधी पुण्यतीथी निमित्त कार्यक्रम.



स्व. राजीव गांधी यांना अभिवादन करतांना प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके, प्रा. विजय तिडके, श्री. भगवान भिंगारे व श्री. सुरेश धुले.

दि- 25-05-2021 स्व. बापुसाहेब आंधळे यांना श्रध्दांजली अर्पण कार्यक्रम-



दि. 27-05-2021 पंडीत जवाहरलाल नेहरू पुण्यतीथी व माता रमाई आंबेडकर स्मृती दिन कार्यक्रम



पंडीत जवाहरलाल नेहरू व माता रमाई आंबेडकर यांना अभिवादन करतांना प्राचार्य डॉ सुनंदा तिडके, व प्राध्यापक व कर्मचारी.

दि. 31 मे 2021 पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती कार्यक्रम



पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांना अभिवादन करतांना. प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके, प्रा. डॉ. [illegible] देशपांडे, श्री. अर्जुन भावड.